# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-६२ दिनांक:- १७/०३/२०२१

## विनापरवाना अग्निशस्त्र व तलवारी बाळगणाऱ्या गुन्हेगारांना गुन्हेशाखेकडुन अटक.

गुन्हे शाखा -२, वसई चे पोलीस निरीक्षक, श्री. शाहुराज रणवरे यांना मिळालेल्या माहिती वरुन नालासोपारा पुर्व, हायटेंशन रोड येथील एका बिल्डींग मध्ये विनापरवाना अग्निशस्त्र व तलवारी बाळगणाऱ्या इसम नामे १) विजय उर्फ अमित अमरबहादुर सिंग, वय -२६, रा. नालासोपारा पुर्व, २) सलमान सलिम हाश्मी उर्फ सलमान खान वय-३२, रा. विरार प., ३) आशुतोष रमाशंकर दुबे उर्फ बाबा दुबे, वय-३५, रा. नालासोपारा पुर्व, ४) मोहम्मद तालिम साहिल शेख, वय-२८, रा. नालासोपारा पुर्व यांना ताब्यात घेतले असता त्यांचे कब्जातुन विनापरवाना असलेले १९,२००/- रु किंमतीचा गावठी बनावटीचा कट्टा, ०१ जिवंत काडतुस व ०४ तलवारी हस्तगत करण्यात आल्या आहेत. सदरबाबत तुळींज पोलीस ठाणेस गु.रजि.नं. I३८७/२०२१, भारतीय हत्यार अधि. कलम ३,४,२५ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद इसमांकडे अधिक तपास केला असता विजय उर्फ अमित अमरबहादुर सिंग, वय -२६, रा. नालासोपारा पुर्व याचे विरुध्द तुळींज पोलीस ठाणेस १) गु.रजि.नं. I४९५/२०१८, भा.द.वि.सं.कलम ३२३, ३२४, ५०६, ३४ प्रमाणे, २) गु.रजि.नं. I११९७/२०१९, भा.द.वि.सं.कलम ३०२, ३४ या गुन्हयांत पाहीजे अरोपी असुन सलमान सलिम हाश्मी उर्फ सलमान खान याचे विरुध्द तुळींज पोलीस ठाणे गु.रजि.नं. I०२/२०१५, भा.द.वि.सं. कलम ३२४, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हयांत पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) व श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा २ चे पोलीस निरीक्षक, श्री. शाहुराज रणवरे, सपोनि/श्री. संतोष गुर्जर, सपोनि/ श्री. सुहास कांबळे, सहा.फौ/ महादेव वेद पाठक, पोहवा/ मंगेश चव्हाण, पोहवा/ संजय नवले, पोहवा/ रमेश भोसले, पोहवा / विकास यादव, पोना/रमेश अलदर, पोना/प्रशांत पाटील, पोना/अमोल तटकरे, पोना/प्रशांत ठाकुर, पोकॉ/ शरद पाटील, पोकॉ/अमोल कोरे यांनी केली आहे.

Scanned with CamScanner

# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-६३ दिनांक:- १७/०३/२०२१

## घरफोडया करणाऱ्या सराईत गुन्हेगारास गुन्हेशाखा युनिट-३ विरार यांनी ताब्यात घेवून लाखो रुपये किंमतीचे सोन्या, चांदीचे दागिने व रोख रक्कम केली हस्तगत.

दिनांक ०७/०३/२०२१ रोजी सकाळी ०९.०० वाजता ते दिनांक १४/०३/२०२१ रोजी संध्याकाळी १७.०० वाजता दरम्यान फिर्यादी श्री रमेश धोंडु हुंबरकर वय-४० वर्षे, रा. नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर हे त्यांच्या मुळ गावी गेले असताना त्यांच्या बंद फ्लॅटचे किचनचे खिडकीचे बाहेरील लोखंडी ग्रील कोणीतरी अज्ञात चोरटयाने तोडुन घरात प्रवेश करून त्यांचे घरातील २५ तोळे सोने, १ किलो चांदी व १७,००,०००/- रुपये रोख रक्कम अशी एकुण २४,९३,०००/- रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम घरफोडी चोरी करुन चोरुन नेले बाबत तुळींज पो.ठाणे येथे दिलेल्या तक्रारी वरुन गु.र.नं. I ३८०/२०२१ भा.द.वि.स.कलम- ४५४,४५७,३८० प्रमाणे दि.१५/०३/२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) , मा. सहा पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरार चे पोलीस पथक यांनी नमुद गुन्हयाचे तपासाच्या अनुषंगाने तांत्रीक विश्लेषण, सि.सि.टि.व्ही. फुटेज, गुप्त बातमीदार, गुन्हे करण्याची पध्दत, याबाबत सखोल तपास करुन तसेच पोना/ मनोज सकपाळ यांना बातमीदार यांचेकडून मिळालेल्या माहीतीवरुन आरोपीत नामे- अब्दुल इद्रीस शेख वय- ४३ वर्षे, रा. नालासोपारा पुर्व. यास ताब्यात घेवुन त्याचे कब्जातुन एकुण २९ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, २ किलो वजनाचे चांदीचे दागिने व नाणी, तसेच रोख रक्कम ९,७६,२५०/- रुपये व गुन्हयात वापरलेली ॲक्टीवा मोटरसायकल असा एकुण १८,५३,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, श्री. एस. जयकुमार, अपर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ उमेश भागवत, सफौ/ अनिल वेळे, पो.हवा/ अशोक पाटील, पो.ना/ मनोज चव्हाण, पो.ना/ प्रदीप टक्के, पो.ना/ मुकेश तटकरे, पो.ना./सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.शि/ अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांनी पार पाडली आहे.

Scanned with CamScanner